**मे. मॅगनीज ओर इंडिया लिमिटेड या कंपनीद्वारे गुमगांव, खोडेगांव, तेगई, खापा, खापापेठ व राजना, ता.सावनेर, जि.नागपूर येथे गुमगांव आणि खोडेगांव खाणीचे एकत्रीकरण (एकत्रीकरण लीज क्षेत्र – २१२.७३६ हेक्टर) आणि मॅगनीज खनिज उत्पादन क्षमता ३,०५,२०० टन प्रतीवर्ष वरून ६,०५,२०० टन प्रतीवर्ष विस्तारीकरणासाठी प्रस्तावित प्रकल्पाची दि.१२/०९/२०२५ रोजी घेण्यात आलेल्या पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीचे इतिवृत्त.**

*******

केंद्र शासनाच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाची अधिसूचना दि.१४.०९.२००६ व सुधारीत अधिसूचना दि. ०१.१२.२००९ अन्वये मे. मॅगनीज ओर इंडिया लिमिटेड या कंपनीद्वारे गुमगांव, खोडेगांव, तेगई, खापा, खापापेठ व राजना, ता.सावनेर, जि.नागपूर येथे गुमगांव आणि खोदेगांव खाणीचे एकत्रीकरण (एकत्रीकरण लीज क्षेत्र – २१२.७३६ हेक्टर) आणि मॅगनीज खनिज उत्पादन क्षमता ३,०५,२०० टन प्रतीवर्ष वरून ६,०५,२०० टन प्रतीवर्ष विस्तारीकरणासाठी प्रकल्पाची पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी दिनांक १२/०९/२०२५ रोजी सकाळी ११.३० वाजता प्रकल्पाचे स्थळ प्रकल्पाचे स्थळ गुमगांव माईन, मे. मॅगनीज ओर इंडिया लिमिटेड, पो.खापा, ता.सावनेर, जि.नागपूर येथे श्री. अनुप खांडे, अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, नागपूर यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. श्रीमती. हेमा देशपांडे,प्रादेशिक अधिकारी,नागपूर ह्या म.प्र.नि.मंडळाच्या प्रतिनिधी तथा लोक सुनावणी समितीच्या सदस्या म्हणून उपस्थित होत्या व श्रीमती. धनश्री पाटील, उप-प्रादेशिक अधिकारी, नागपूर-१ यांनी समन्वयक म्हणून काम केले व अध्यक्षांच्या संमतीने ११.३० वाजता पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीची कार्यवाही सुरू केली. पर्यावरण विषयक लोक सुनावणीच्या वेळी उपस्थित असलेल्या नागरीकांच्या नावांची यादी सोबत जोडली आहे **(सहपत्र-१)**.

**पार्श्वभूमी**

मे. मॅगनीज ओर इंडिया लिमिटेड या कंपनीद्वारे गुमगांव, खोडेगांव, तेगई, खापा, खापापेठ व राजना, ता.सावनेर, जि.नागपूर येथे गुमगांव आणि खोडेगांव खाणीचे एकत्रीकरण (एकत्रीकरण लीज क्षेत्र – २१२.७३६ हेक्टर) आणि मॅगनीज खनिज उत्पादन क्षमता ३,०५,२०० टन प्रतीवर्ष वरून ६,०५,२०० टन प्रतीवर्ष विस्तारीकरणासाठी प्रस्तावित प्रकल्पाच्या पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीकरिता अर्ज म.प्र.नि.मंडळ, मुख्यालय, मुंबई येथे दि.१९/०६/२०२५ रोजी पत्राद्वारे सादर केलेला होता. त्या अनुषंगाने मंडळाच्या मुख्यालयाने पत्र क्र. MPCB/JD(WPC)/ENV-PH/B-२५०६२४ -FTS-०१११५ दि. २४/०६/२०२५ अन्वये जनसुनावणीची प्रक्रिया सुरू करण्याबाबत निर्देश प्रदान केले होते **(सहपत्र-२)**.

**प्रयोजन व कार्यपध्दती**

उप-प्रादेशिक अधिकारी, नागपूर-१ यांनी अध्यक्षांच्या परवानगीने लोकसुनावणी समितीचे सदस्य व उपस्थितांचे स्वागत करून लोकसुनावणीला सुरवात केली.

सर्वप्रथम मा.अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष, जन सुनावणी समिती यांनी जाहिर लोकसुनावणी घेण्याबाबतचा उद्देश व त्याची कार्यपध्दती समजावून सांगितली. त्यानुसार या ठिकाणी प्रकल्पाला परवानगी बाबतचा कोणताही निर्णय घेण्यात येणार नाही असे स्पष्ट केले. या जाहिर लोक सुनावणीमध्ये घेण्यात येणाऱ्या आक्षेपांची नोंद घेणे व शासनास पाठविणे एवढेच काम ही समिती करेल. त्यामुळे उपस्थित जनतेला या प्रकल्पाबाबत त्यांच्या सूचना, टिका, टिप्पणी, निवेदने व आक्षेप घ्यावयाचे असतील तर या ठिकाणी तोंडी अथवा लेखी मांडावयाचे आहेत त्याची नोंद घेतली जाईल व शासनास पाठविण्यात येईल असे सांगितले.

..२/-

उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, नागपूर-१ यांनी भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाची अधिसूचना क्र. **SO 60 (E) dtd. 27th Jan. 1994** व सुधारणा दिनांक १४ सप्टेंबर, २००६ नुसार लोकसुनावणी घेण्याचे प्रयोजन विशद आहे असे नमुद केले. तसेच त्यामधील तरतुदीनुसार दिनांक ०६/०८/२०२५ ला दैनिक हितवाद (इंग्रजी) व दैनिक लोकमत (मराठी) या दोन मोठ्या प्रमाणात वितरीत होत असलेल्या स्थानिक वृत्तपत्रात या पर्यावरण विषयक लोकसुनावणीबद्दल जाहीर सूचना प्रसिध्द करण्यात आली आहे असे कळविले. वृत्तपत्रांत प्रसिध्द झालेल्या सुचनांच्या कात्रणाची प्रत सोबत जोडली आहे. **(सहपत्र-२).**

भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचने प्रमाणे पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तसेच प्रकल्पाची ठळक वैशिष्ठे असलेल्या संक्षिप्त अहवाल (इंग्रजी व मराठी मध्ये) व इतर माहिती असलेले कागदपत्रे विविध सरकारी कार्यालयात तसेच ग्रामपंचायत कार्यालयात ३० दिवसापूर्वी नागरीकांच्या अवलोकनार्थ ठेवण्यात आलेले होते. जाहिर सूचना प्रसिध्द झाल्यापासून जाहिर सुनावणीच्या तारखेपुर्वी परिसरातील लोकांकडून लिखीत स्वरूपात सूचना, टीका-टिप्पणी व आक्षेप मागविण्यात आलेले होते. जाहीर लोकसुनावणीच्या दिवसापर्यंत एकुण २ निवेदन म.प्र.नि.मंडळाकडे प्राप्त झाले असुन प्रत सोबत जोडण्यात येत आहे **(सहपत्र-३).** मंडळाचा आदेश क्र. ई-५९/२०२५ पत्र क्र. BO/JD/(WPC)/PH/B-250813-FTS-0004 dtd. 13/08/2025 नुसार लोक सुनावणी समिती गठीत करण्यात आली. या आदेशाची प्रत सोबत जोडत आहे **(सहपत्र-४).**

उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, नागपूर-१ तथा समन्वयक यांनी प्रकल्प धारकाला प्रकल्पाबद्दल व पर्यावरणीय अहवालाबाबत विस्तृत सादरीकरण करण्यास सांगितले. तदनुसार, प्रकल्प धारकाच्या प्रतिनिधीने तपशिलवार मराठी भाषेत प्रस्तावित गुमगांव आणि खोदेगांव खाणीचे एकत्रीकरण (एकत्रीकरण लीज क्षेत्र – २१२.७३६ हेक्टर) आणि मॅंगनीज खनिज उत्पादन क्षमता ३,०५,२०० टन प्रतीवर्ष वरून ६,०५,२०० टन प्रतीवर्ष विस्तारीकरणासाठी पर्यावरण विषयक बाबींबाबत प्रकल्प परिसर, प्रस्तावित प्रकल्पाचे लाभ, प्रस्तावित सुविधा, अग्निशामक सुविधा, प्रक्रियेचे विवरण, वातावरणाची माहिती आणि अपेक्षित परिणामांची पडताळणी, जमिनीवरील घटक, वातावरण व हवामान, हवेतील घटक, परिसरातील हवेचा दर्जा, आपत्ती व्यवस्थापन योजना, हवा प्रदूषणाचे स्त्रोत, ध्वनी घटक, जल घटक, उपलब्ध पाण्याचा दर्जा, पाण्याचा वापर, सांडपाण्याची निर्मिती, जैविक घटक, सामाजिक आणि आर्थिक घटक, स्थानिक मूलभूत सोयीसुविधांवर होणारा परिणाम, पर्यावरण व्यवस्थापन योजना, हवेतील उत्सर्जन, सांडपाणी व्यवस्थापन, वनीकरण कार्यक्रम, काळजी व्यवस्थापन आणि परिक्षण या बाबींवर सादरीकरण केले.

सादरीकरणा नंतर उप-प्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंडळ, नागपूर-१ यांनी उपस्थितांना सदर प्रकल्पाबाबत काही प्रश्न, सुचना, टिका, टिप्पणी आक्षेप सुचवायचे असल्याचे त्यांनी आपले नांव व गावाचे नांव सांगुन मुद्दे उपस्थित करावे, असे आव्हान केले.

**जनसुनावणी दरम्यान चर्चेतील प्रश्न, टीका, टिप्पणी, आक्षेप, सुचना तसेच प्रकल्प धारकाने दिलेली उत्तरे/आश्वासने खालील प्रमाणे आहेत:**

**१) श्री. पियुष बुरडे, खापा, जि.नागपूर**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १ | प्रकल्पधारक विस्तारीकरणासाठी किती जमीन भाडेपट्टयावर घेणार आहे व एकुण भाडेपट्टा किती राहणार. तसेच शेतकऱ्यांना भाडेपट्टयाबाबत माहिती देणे आवश्यक आहे. | मुद्यांची नोंद घेण्यात आली. तसेच शेतकऱ्यांचे भाडेपट्टा विषयक मत जाणुन घ्यावे, ही बाब नोंद करून घेतली आहे. |

..३/-

| | | |
|---|---|---|
| २ | या जनसुनावणीबाबत तिन्ही ग्रामपंचायतीमध्ये दवंडी झाली पण लोकसुनावणीच्या उद्देशांबाबत लोकांना कल्पना नव्हती. | दिनांक ०६/०८/२०२५ ला दैनिक हितवाद (इंग्रजी) व दैनिक लोकमत (मराठी) या दोन मोठ्या प्रमाणात वितरीत होत असलेल्या स्थानिक वृत्तपत्रात या पर्यावरण विषयक लोकसुनावणीबद्दल जाहीर सूचना प्रसिध्द करण्यात आली होती. तसेच सदर सुनावणी ही पर्यावरण विषयक लोकांचे मत आक्षेप जाणून घेण्याकरीता आहे. |
| ३ | खाणीमुळे शेतकऱ्यांच्या विहिरी, बोरवेल व पाण्याच्या स्त्रोतांची पातळी खालावणार आहे का? खालावणार असेल तर त्याबाबत काय उपाययोजना करणार आहेत. | मुद्यांची नोंद घेण्यात आली व कंपनीद्वारे वृक्ष लागवड करण्यात येईल, जेणेकरून पाण्याची पातळी खालावणार नाही. |
| ४ | वाहतुकी दरम्यान खराब होणाऱ्या रस्त्यांकरीता कोणत्या उपाययोजना करणार. | गावांतील रस्त्याचे बांधकाम करण्यात येईल. तसेच जड वाहनांसाठी वाहनतळ उभारण्यात येईल. |

**२) श्रीमती. संगिता बाविस्कर, माजी सरपंच, ग्रामपंचायत, तेगई, जि.नागपूर**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १ | ग्रामपंचायतीमार्फत मॉयलला वन जमीन दिलेली असून कुठल्याच पर्यावरण बाबी दिसून येत नाही. रस्ता राहिलेला नाही. वन जमीनीच्या मोकळया जागेवर सौंदर्यीकरण करावे. | गावांतील रस्त्याचे बांधकाम करण्यात येईल. |
| २ | मॉयलने ग्रामपंचायतीला किंवा बचत गटांना मदत करावी. गावात दवाखाने नसल्यामुळे आरोग्यसेवा त्वरीत उपलब्ध होत नाही. | गावांतील विकासकामे तसेच नागरी मुलभूत सुविधा पुरविण्यासाठी कॉर्पोरेट सामजिक जबाबदारी (CSR) अंतर्गत रू. २६ लक्ष ची तरतुद केलेली आहे. |

**३) श्री. रमेश बळसकर, सरपंच, ग्रामपंचायत तेघई, जि.नागपूर**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १ | मॉयलने दहनघाटाकरीता २ एकर जमीन दयावी. गावांतील पांदण रस्ता बंद झालेला आहे. नदीवर पूल तयार करून दयावा. | गावांतील विकासासाठी कॉर्पोरेट सामजिक जबाबदारी (CSR) अंतर्गत रू. २६ लक्ष ची तरतुद केलेली आहे. |

**४) श्री. प्रफुल मोहिते, खापा, जि.नागपूर**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १ | सदर जनसुनावणी ही मॅगनीज खनिज उत्पादन क्षमता ३,०५,२०० टन प्रतीवर्ष वरून ६,०५,२०० टन प्रतीवर्ष विस्तारीकरणासाठी घेण्यात येत आहे. | मुद्यांची नोंद घेण्यात आली. |
| २ | यांनी प्रकल्पाबाबत पर्यावरणावर नुकसान होणार जसे की, उत्पादन क्षेत्राची हद्दवाढ, जंगलतोड, जैवविविधतेचा ऱ्हास, हवामान, पर्जन्यमान व तापमानामुळे वन्य प्राण्यांवर व पक्षांवर परिणाम. भूजलाची पातळी व नदीचा प्रवाह कमी होणार. ध्वनीच्या पातळी व धुळीमुळे श्वसनावर, आरोग्यावर परिणाम, फुफ्फसांचे आजार, शेती नष्ट होईल, शेती व जनावरांवर परिणाम, रस्त्याचे नुकसान, मंदिर व शाळेवर परिणाम इ. बाबी सांगितल्या. | मुद्यांची नोंद घेण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| ३ | तसेच प्रकल्पामुळे होणारे फायदे जसे की, रोजगार उपलब्ध होईल व आर्थिक विकास, खनिजामुळे महसूल मिळणार, औद्योगिक विकास होणार. कच्चा माल उपलब्ध झाल्यास स्थानिकांना उद्योग उभारता येईल. | मुद्यांची नोंद घेण्यात आली. विस्तारीकरणा दरम्यान ४०० रोजगारांची आवश्यकता राहील. |
| ४ | मॉयलने खापा येथील लोकांना रोजगारात प्राधान्य दयावे. तसेच शेतकऱ्यांची जमीन शेतकऱ्यांना विश्वासात घेवून अधिग्रहित करावी. | मुद्यांची नोंद घेण्यात आली. खापा येथील लोकांना रोजगारात प्राधान्य देण्यात येईल. |
| ५ | मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करावी, जेणेकरून आरोग्यावर परिणाम होणार नाही. | मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करण्यात येईल. |
| ६ | ग्रामपंचायत तेघई व खोदेगांव व खापा करीता कॉर्पोरेट सामजिक जबाबदारी (CSR) घ्यावी. | कॉर्पोरेट सामजिक जबाबदारी (CSR) अंतर्गत रू. २६ लक्ष ची तरतुद केलेली आहे. |
| ७ | खापा गावांतील नालेसफाईकरीता Vaccum Machine आणि JCB उपलब्ध करून दयावी. | मुद्दयांची नोंद घेण्यात आली. |
| ८ | वाहतुकीमुळे ध्वनी प्रदूषण होणार, मॉयलने जड वाहनांसाठी व्यवस्था करावी (Parking). | सदर खाण ही भूमिगत असल्याने ध्वनीची पातळी विहित मर्यादित राहील. जड वाहनांसाठी वाहनतळ उभारण्यात येईल. |
| ९ | खाणीमध्ये ब्लास्टिंगकरीता आधुनिक साधनाचा वापर करावा. | खाणीमध्ये ब्लास्टिंगकरीता आधुनिक साधनांचा वापर केल्या जाईल. |

**५) श्री. सरपंच, ग्रामपंचायत, गुमगांव, जि.नागपूर**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १ | गुमगांव येथील नदीवर पूल बांधण्यात यावा, रस्त्याचे डांबरीकरण, पथदिवे व पांदन रस्ता तयार करून दयावा. | गावांतील विकासकामांकरीता कॉर्पोरेट सामजिक जबाबदारी (CSR) अंतर्गत रू. २६ लक्ष ची तरतुद केलेली आहे. |

**६) श्री. पंकज बनसिंगे.**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १ | या भागात बेरोजगारांची समस्या असून रोजगार उपलब्ध झालेला आहे. प्रकल्पाच्या विस्तारीकरणामुळे रोजगार वाढतील. | मुद्यांची नोंद घेण्यात आली. |
| २ | मॉयलमुळे रोजगार मिळाला. मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करून वृक्षांच्या संगोपनाकरीता कठडे लावण्यात यावे. | मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करण्यात येईल व वृक्षांच्या संगोपनाकरीता कठडे लावल्या जातील. |

**७) श्री. नामदेव गजभिये, खापा, जि.नागपूर.**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १ | शेतकऱ्यांच्या जमीनीवर मॉयलचे नांव आलेले नाही. मॉयलने कंत्राटी रोजगार दयावा. प्रकल्पास समर्थन दर्शविला. | मुद्यांची नोंद घेण्यात आली. |

८) श्री. किरण दहिवले, गुमगांव, जि.नागपूर

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १. | मॉयलमध्ये रोजगार मिळतो. | मुद्यांची नोंद घेण्यात आली. |

९) श्री. राकेश पटेल, ठेकेदार

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १. | येथे रोजगाराची समस्या असून स्थानिकांना रोजगार दयावा. | स्थानिकांना रोजगारात प्रथम प्राधान्य देण्यात येईल. |

१०) श्री. खेमराज बारापात्रे, जि.नागपूर

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १. | स्थानिकांना रोजगार दयावा. मॉयल लगतच्या पाच गावांकरीता जास्तीत जास्त कॉर्पोरेट सामजिक जबाबदारी (CSR). घ्यावी | स्थानिकांना रोजगारात प्रथम प्राधान्य देण्यात येईल. कॉर्पोरेट सामजिक जबाबदारी (CSR) अंतर्गत रू. २६ लक्ष ची तरतुद केलेली आहे. |
| २ | पर्यावरणाचे नुकसान होणार नाही, याची काळजी घ्यावी, वृक्ष लागवड करावी, पर्यटन स्थळ उभारावे. | मुद्यांची नोंद घेण्यात आली. मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करण्यात येईल. |

११) श्री. मुकेश तावडे, खापा, जि.नागपूर

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १. | मॉयलने शेतकऱ्यांची जमीन भाडेतत्वावर घ्यावी, शेतकऱ्यांचे नुकसान होणार नाही याची दक्षता घ्यावी. | मुद्यांची नोंद घेण्यात आली. भूमिगत खाणीमुळे शेतकऱ्यांचे नुकसान होणार नाही. |
| २. | रस्त्याच्या दुर्दशामुळे अपघाताचे प्रमाण वाढलेले असून मॉयलने रस्त्याची मजबुतीकरण करावे. | रस्त्याचे मजबुतीकरण करण्यात येईल. |

१२) श्री. राहूल लांबट, खापा, जि.नागपूर

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १. | मॉयलमध्ये रोजगार मिळालेला आहे. | --- |

१३) श्री. जयंत वानखेडे, नगर परिषद, खापा, जि.नागपूर

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १. | हवा व ध्वनी प्रदूषणावर मॉयल कोणत्या उपाययोजना करणार. | भूमिगत खाणींमध्ये ध्वनीची पातळी विहित मर्यादेत राहील. तसेच हवा व ध्वनी प्रदूषण रोखण्यासाठी आधुनिक साधणांचा वापर करण्यात येईल. |
| २. | जड वाहनांच्या वाहतुकीमुळे परिसरातील रस्ते खराब झालेले आहेत. | रस्त्याचे मजबुतीकरण करण्यात येईल. |
| ३. | विस्तारीकरणामुळे खापा गावांस परिणाम होण्याची शक्यता आहे. हरितपट्टा विकसीत करावा. | मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करण्यात येईल. |

..६/-

१४) श्री. किशोर डाखोरे, नगर परिषद, खापा, जि.नागपूर

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १. | शेतकऱ्यांना शेतीसाठी पाण्याची समस्या निर्माण झालेली आहे. | मुद्यांची नोंद घेण्यात आली. |
| २. | दूषित पाण्यामुळे जनावरांवरे व शेतकऱ्यांच्या दुग्ध व्यवसायावर परिणाम झालेला आहे. | मुद्यांची नोंद घेण्यात आली. |
| ३. | जनसुनावणीबाबत पुर्वकल्पना नसल्याने विरोध दर्शविला. | दिनांक ०६/०८/२०२५ ला दैनिक हितवाद (इंग्रजी) व दैनिक लोकमत (मराठी) या दोन मोठ्या प्रमाणात वितरीत होत असलेल्या स्थानिक वृत्तपत्रात या पर्यावरण विषयक लोकसुनावणीबद्दल जाहीर सूचना प्रसिध्द करण्यात आली होती. तसेच ग्रामपंचायतीमध्ये दवंडी दिलेली आहे. |

१५) श्री. संगिता उईके, सरपंच, ग्रामपंचायत, खोडेगांव, जि.नागपूर

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १. | मॉयल प्रशासनास ग्रामपंचातयने मागील ३ वर्षापासून ठराव दिल्यानंतरही कॉर्पोरेट सामजिक जबाबदारीचा (CSR) लाभ मिळालेला नाही. | कॉर्पोरेट सामजिक जबाबदारी (CSR) अंतर्गत रू. २६ लक्ष ची तरतुद केलेली आहे. |
| २. | खोदेगांवास Water Filter ची आवश्यकता आहे. | खोदेगावासाठी Water Filter देण्यात येईल. |
| ३. | खोदेगांवामधून वाहतुक जास्त प्रमाणात आहे, ब्लास्टींगमुळे खोडेगांवावर परिणाम होण्याची शक्यता आहे. | भूमिगत खाणीमध्ये ब्लास्टींगकरीता आधुनिक साधनांचा वापर करण्यात येईल. |

१६) श्री. दिनेश सांबळे, खापा, जि.नागपूर

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १. | खापा येथील युवकांना रोजगार मिळालेला आहे, प्रकल्पास पाठिंबा दर्शविला. | मुद्यांची नोंद घेण्यात आली. |

१७) श्री. अमोल भुले, खापा, जि.नागपूर

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १. | खाणीच्या धुळीकण व जल प्रदूषणामुळे आरोग्यावर परिणाम होतो. मॉयलने उपाययोजना करावी. | भूमिगत खाण असल्याने धुळीकणांचे प्रमाण कमी प्रमाणात राहील व जल प्रदूषणाकरीता प्रक्रिया यंत्रणा उभारण्यात येईल. |
| २. | मॉयलने किती वृक्ष लागवड केलेली आहे. | --- |

..७/-

१८) श्री. रवि परतेकी, खापा, जि.नागपूर

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १. | ब्लास्टिंगमुळे बारीक धुळीकण नदीमध्ये मिसळतात व काही जनावरे नदीतील पाणी पिल्याने दगावलेली आहेत. यावर योग्य ती उपायोजना करून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई दयावी. | मुद्यांची नोंद घेण्यात आली. |

हेमा देशपांडे, सदस्या, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती तथा प्रादेशिक अधिकारी, नागपूर, यांनी उपस्थितांना संबोधले की, प्रकल्प प्रवर्तकाने सादरीकरणाद्वारे संपूर्ण माहिती सांगितलेली आहे. उपस्थितांनी मांडलेले मुद्दे व प्रकल्प प्रवर्तकांनी दिलेले उत्तर याचे एकत्रीकरण करून केंद्र शासनाच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाकडे पाठविण्यात येतील.

श्री. अनुप खांडे, अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती तथा अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, नागपूर यांनी उपस्थितांनी मांडलेल्या मुद्यांची उजळणी केली. या जनसुनावणीच्या उद्देशाबाबत माहिती नसल्याचा मुद्दा उपस्थित केलेला आहे. त्याअनुषंगाने जनसुनावणीच्या अध्यक्षांनी स्पष्ट केले की, मराठी व इंग्रजी वृत्तपत्रामध्ये सुनावणीबाबत ज़ाहिरात प्रसिध्द केलेली होती व ही जनसुनावणी पर्यावरण विषयक लोकांचे आक्षेप, मुद्दे जाणून घेण्यासाठी आयोजीत केलेली आहे. प्रकल्प प्रवर्तकाने स्थानिक संस्थाशी समन्वय साधावा. वाहतुकीमुळे रस्ते खराब झालेले आहेत यावर मॉयलने उपाययोजना करावी, वाहनतळाची उपाययोजना करावी. कॉर्पोरेट सामजिक जबाबदारी (CSR) बाबत स्थानिक संस्थाच्या सुचनेनुसार खर्च करावा, असे अपेक्षीत आहे. हरितपट्टा विकसीत करावा. जल प्रदूषणासाठी अद्यावत तंत्रज्ञानाचा वापर करावा. तसेच जर कुणाच्या लेखी नोंदी असतील त्यांनी समितीकडे जमा करण्याबाबत सुचित केले. उपरोक्त नागरीकांनी उपस्थित केलेले मुद्दे तसेच प्रकल्प प्रवर्तकांनी दिलेली उत्तरे यांची नोंद घेवून शासनाकडे पाठविण्यात येईल.

मा.अध्यक्षांनी पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी संपली असे जाहिर केले.

(हेमा देशपांडे)
सदस्या, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, नागपूर

(धनश्री पाटील)
समन्वयक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, नागपूर-१

(अनुप खांडे)
अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, नागपूर